# महाराष्ट्र राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट)

**(विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त व महाराष्ट्र व गोवा शासन प्राधीकृत)**

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

सेट भवन, गणेशखिंड पुणे,-४११००७.

दूरध्वनी क्र.: ०२० – २५६२२४४६
संकेतस्थळ : https://setexam.unipune.ac.in

फॅक्स क्र. : ०२० – २५६९९२५०
ई-मेल : set_coordinator@unipune.ac.in

सहायक प्राध्यापक पदासाठी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा


OW/2024/G/७४ दिनांक: २९/०४/२०२४

**सेट परीक्षा विभागातर्फे सेट परीक्षेची प्राथमिक उत्तरतालिका दिनांक ३०/०४/२०२४ रोजी जाहीर होणार**

राज्यस्तरीय पात्रता परीक्षा विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने ३९ वी सेट परीक्षा दिनांक ७ एप्रिल, २०२४ रोजी महाराष्ट्र व गोव्यातील एकूण १७ शहरातील २८९ परीक्षा केंद्रावर घेण्यात आली. सेट परीक्षा विभागातर्फे सेट परीक्षेची प्राथमिक उत्तरतालिका (Interim Answer Key) दिनांक ३०/०४/२०२४ रोजी जाहीर होणार असून प्राथमिक उत्तरतालिकेबाबत तसेच सेट परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेबाबत काही सूचना /तक्रारी दिलेल्या उत्तरास आवाहन करावयाचे असल्यास विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील http://setexam.unipune.ac.in या लिंकवर असलेल्या ऑनलाईन फॉर्म आवश्यक त्या पुराव्यासह व शुल्कासह सादर करावयाचा आहे.

विद्यार्थ्यांनी विद्यापीठ सेट संकेतस्थळावरील सर्व सूचना काटेकोरपणे वाचून दिलेल्या सूचनेप्रमाणे आपले प्राथमिक उत्तरतालिकेबाबत काही सूचना असल्यास ऑनलाईन पध्दतीने आवश्यक त्या शुल्कासह अर्ज करावेत, सदर अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने जमा करावेत, व्यक्तीशः किंवा टपालामार्फत सेट विभागात स्विकारले जाणार नाहीत.

सदर उत्तरतालिकेबाबतची लिंक वरील संकेतस्थळावर दिनांक **३०/०४/२०२४ पासून दिनांक ०९/०५/२०२४ संध्याकाळी ६.००** वाजेपर्यंत उपलब्ध आहे. दिनांक ०९/०५/२०२४ नंतर उत्तरतालिकेबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रारी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार ग्राहय धरल्या जाणार नाही, याची सर्व परीक्षार्थ्यांनी नोंद घ्यावी.

या प्रक्रियेनंतर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार अंतिम उत्तरतालिका निकाला बरोबर जाहीर करण्यात येईल.

२९/४/२०२४

**प्रा. (डॉ.) विजय खरे**
**कुलसचिव तथा सदस्य सचिव (सेट)**